# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर




भारतीय प्रजासत्ताक चिरायु होवो ! जय हिंद !!

## राज्यातील सर्व अंगणवाडी कर्मचारी कामावर रुजू होणार

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- अंगणवाडी सेविकांचा संप तूर्तास स्थगित करण्यात आला असून २६ जानेवारीपासून राज्यातील सर्व अंगणवाडी कर्मचारी कामावर रुजू होणार असल्याची माहिती समोर आली आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी संप पुकारला होता. त्याच पार्श्वभूमीवर महिला आणि बाल विकास सचिव यांच्या कक्षात २५ जानेवारी रोजी महत्त्वाची बैठक पार पडली. यामध्ये अनेक मुद्द्यांवर चर्चा होऊन अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या वतीने सुरु असलेला अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा संप हा तूर्तास स्थगित करण्यात आला आहे. अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे निमंत्रक दिलीप उटाणे यांनी ही माहिती दिली आहे. या बैठकीमध्ये अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आहे. तसेच शासनाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजनेचा अंतिम प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रीमंडळ मंजुरीसाठी पाठवण्यात येणार असल्याचं या बैठकीत सांगण्यात आलंय. तसेच कृती समितीच्या वतीने पेन्शन योजनेसंदर्भात देखील ठोस सुधारणांचा लेखी प्रस्ताव देण्यात आलाय.


(वर्ष ६३ वे अंक ३७) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. – ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.२६ जानेवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# आझाद मैदानातील उपोषणाला पोलिसांनी परवानगी नाकारली; पण जरांगे मुंबई गाठण्यावर ठाम

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी सरकारशी दोनहात करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानावरील उपोषणाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. आझाद मैदान पोलिसांनी या प्रकरणी जरांगेंना उपोषणासाठी आझाद मैदान अपुरे असल्याचे नमूद करत त्यांना नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर २९ मधील इंटरनॅशनल कॉर्पोरेशन पार्क मैदानात उपोषणाला बसण्याची सूचना केली आहे. पण त्यानंतरही जरांगे आपल्या आझाद मैदानातील मुक्कामावर ठाम असून, त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना आपल्या गाड्यांची



तोंडे मुंबईच्या दिशेने वळवण्याचे आदेश दिलेत.

मनोज जरांगे उद्या २६ जानेवारी रोजी मुंबईत दाखल होणार आहेत. त्यामुळे त्यांच्या आझाद मैदानावरील उपोषणाची मराठा समाजाने जय्यत तयारी केली आहे. आम्ही यापूर्वीच पत्रव्यवहार करून आझाद मैदानाची परवानगी मागितली होती. आम्ही व्यासपीठ उभारण्याचे कामही सुरू केले आहे. उद्या प्रजासत्ताक दिनानिमित्त झेंडावंदनही याच मैदानात करू, असे मराठा आंदोलकांचे नेते वीरेंद्र पवार यांनी सांगितले आहे. दरम्यान, मुंबई पोलिसांनी जरांगेंच्या उपोषणासाठी तयार करण्यात येणारे व्यासपीठ काढण्याची सूचना केली आहे. याविरोधात जरांगे यांचे सहकारी वीरेंद्र पवार यांनी कोर्टात धाव घेतली आहे.

दुसरीकडे, मुंबई पोलिसांनी जरांगे यांना एका नोटीसीद्वारे आझाद मैदानात उपोषण करता येणार नाही, असे कळवले आहे. मराठा आंदोलनामुळे मुंबईची दैनंदिन वाहतूक व्यवस्था कोलमडेल. विशेषतः आंदोलकांची संख्या लक्षात घेता मुंबईत आंदोलकांना जागा पुरेल एवढे मोठे एकही मैदान नाही. त्यामुळे आंदोलन करण्यासाठी खारघरमधील इंटरनॅशनल कॉर्पोरेशन पार्क मैदान संयुक्तिक राहील, असे पोलिसांनी जरांगे यांना आपल्या नोटीसीद्वारे सूचवले आहे.

### मनधरणीचे प्रयत्न सुरु

रात्री उशिरा हाती आलेल्या वृत्तानुसार मराठा समाजाचे आंदोलक मुंबई बाहेरच थांबवण्यासाठी शासनाचा प्रयत्न सुरु झाल्याचे दिसून आले. मनोज जरांगे यांनी केलेल्या मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणी प्रमाणे सरकार तोडगा काढण्याच्या प्रयत्नात असून तशा प्रकारची मनधरणी करण्यासाठी प्रशासनाचे अधिकारी मंगेश चिवटे, विधी आणि न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत भांगे हे मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी आरक्षणावरील तोडग्याचा फार्म्युला घेऊन निघाल्याचे वृत्त समजले. तशा प्रकारचा जिआर जरांगे यांच्याकडे घेऊन ही मंडळी येत असल्याचे काही वृत्तवाहीन्यांनी सांगीतल्याने मराठा समाजाचा मोर्चा माघारी वळणार की मुंबईत धडकणार? हा प्रश्न अनुत्तरीत आहे.

### सरकार तुमचेच, आरक्षण देणारच मात्र सहकार्य करा-मुख्यमंत्री

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- सरकार आरक्षण देण्यावर ठाम असून हे सरकार तुमचंच आहे. आरक्षणाबाबत सरकारची सकारात्मक भूमिका आहे. आरक्षणाच्या भूमिकेसाठी सरकार आखडता हात घेणार नाही. सरकार तुमचंच आहे त्यामुळे मराठा समाजाला आंदोलन करण्याची गरज नाही. सरकारची सकारात्मक भूमिका असतांना आंदोलन करायला नको. तर सरकारला सहकार्य करण्याची गरज असल्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

सरकार आरक्षण देण्यासाठी काम करत आहे. मनोज जरांगे यांना विनंती देखील करण्यात आली आहे. आश्वासन नाही तर जे द्यायचं आहे, त्याचेच काम सध्या सुरु आहे. त्यामुळे सरकारला सहकार्य करण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे यांच्यासह संपूर्ण मराठा समाजाला केलं आहे. दरम्यान मनोज जरांगे यांनी सुरु केलेले मराठा आंदोलन हे आज मुंबईला धडकणार आहे. त्यासाठी नवी मुंबईत तयारी देखील सुरु करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देणार आहोत. मागास आयोगाचे कामदेखील सुरू आहे. त्यासाठी ४० हजार लाख लोक तीन शिफ्टमध्ये काम करत आहेत. कुणबी नोंदी सापडल्यावर तात्काळ प्रमाणपत्र देण्याचे काम सुरू आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या देशवासीयांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला गुरुवारी संध्याकाळी देशाला संबोधित केले. आपल्या भाषणात त्यांनी श्रीराम मंदिराचा उल्लेख केला आणि कर्पूरी ठाकूर यांनाही श्रद्धांजली वाहिली. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, ७५ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला मी तुम्हा सर्वांना हार्दिक शुभेच्छा देते. आपल्या प्रजासत्ताकाचे ७५ वे वर्ष अनेक अर्थाने देशाच्या वाटचालीतील ऐतिहासिक मैलाचा दगड आहे. आपला देश स्वातंत्र्याच्या शतकाकडे वाटचाल करत आहे आणि अमृत कालच्या सुरुवातीच्या टप्प्यातून जात आहे. हा कालखंडातील परिवर्तनाचा काळ आहे.

'प्रजासत्ताक दिन हा आपली मूलभूत मूल्ये आणि तत्त्वे लक्षात ठेवण्याचा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. सह-अस्तित्वाची भावना



भूगोलाद्वारे लादलेली नाही. १४० कोटींहून अधिक भारतीय एक कुटुंब म्हणून राहतात, आपल्या प्रजासत्ताकाच्या मूळ भावनेने एकत्र राहतात. जगातील या सर्वात मोठ्या कुटुंबासाठी, सहअस्तित्वाची भावना भूगोलाने लादलेले ओझे नाही, तर सामूहिक आनंदाचा नैसर्गिक स्रोत आहे, जो आपल्या प्रजासत्ताक दिनाच्या उत्सवातून व्यक्त होतो, असंही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या.

यावेळी बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या भाषणात राम मंदिराचा उल्लेख केला. राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, अयोध्येतील भगवान श्री राम जन्मस्थानी उभारण्यात आलेल्या भव्य मंदिरात स्थापन झालेल्या मूर्तीच्या अभिषेकाचा ऐतिहासिक सोहळा आपण सर्वांनी पाहिला आहे, भविष्यात या घटनेला व्यापक परिप्रेक्ष्यातून पाहिले जाईल, तेव्हा इतिहासकारांना भारताची आठवण होईल.

यावेळी राष्ट्रपतींनी त्यांच्या अभिभाषणात बिहारचे माजी मुख्यमंत्री भारतरत्न कर्पूरी ठाकूर यांचाही उल्लेख केला आहे. त्या म्हणाल्या की, सामाजिक न्यायासाठी अविरत लढा देणाऱ्या कर्पूरी ठाकूरजींची जन्मशताब्दी काल पूर्ण झाली, हे मला नमूद करायचे आहे. कर्पुरीजी हे मागासवर्गीयांचे एक महान वकील होते, ज्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य त्यांच्या कल्याणासाठी समर्पित केले. त्यांचे जीवन एक संदेश होते. कर्पूरीजींना त्यांच्या योगदानाने सार्वजनिक जीवन समृद्ध केल्याबद्दल मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करते असे त्यांनी म्हटले.

## कायदा व सुव्यवस्था राखत जरांगेंच्या आंदोलनाला जागा देण्याची जबाबदारी राज्य सरकारची-हायकोर्ट

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे, कुठलंही आंदोलन हाताळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश स्पष्ट आहेत. त्यासाठी तुम्हाला निर्देशांची वाट पाहण्याची गरज नाही. त्यामुळे मनोज जरांगे-पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनामुळे मुंबईतील जनजीवन विस्कळीत होणार नाही याची जबाबदारी राज्य सरकारची आहे, असं मुंबई उच्च न्यायालयानं स्पष्ट बजावलं आहे.

मुळात मनोज जरांगेंच्या या आंदोलनाची परवानगी मागणारं कुठलंही पत्र मुंबई पोलिसांकडे आलेलं नाही. मात्र या देशात प्रत्येकाला आंदोलनाचा अधिकार आहे. मुंबईतील प्रस्तावित मराठा आंदोलन टाळण्यासाठी राज्य सरकार पूर्ण सक्षम आहे. परंतु जर त्याचे विपरीत परिणाम झाले तर जबाबदारी कोणाची?, असा सवाल आहे. या राज्य सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. जरांगे-पाटील ज्या संख्येनं आंदोलकांना सोबत घेऊन येतायत ते पाहता त्यांना आंदोलन करण्यासाठी कुठे जागा द्यायची? हे राज्य सरकारनं ठरवावं.

आझाद मैदानात केवळ पाच हजार जण आंदोलन करु शकतात, असं महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयात स्पष्ट केलं. त्याची नोंद करुन घेत या आंदोलनासाठी योग्य ती जागा सरकारने द्यावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे आता मराठा आंदोलन मुंबईत धडकण्याचा मार्ग एकाप्रकारे मोकळा झाला आहे. मात्र याप्रकरणी हायकोर्टानं मनोज जरांगे-पाटील आणि मुंबई पोलिसांना नोटीस जारी करत दोन आठवड्यांत उत्तर देण्याचे निर्देश जारी केलेत.

## 'मविआ'च्या बैठकीत जागा वाटपावर सकारात्मक चर्चा-संजय राऊत

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीच्या वतीने आज मुंबईत महत्त्वाची बैठक पार पडली. सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुमारे सहा तास ४८ जागावाटपावर चर्चा पार पडली. तर ३० जानेवारी रोजी पुन्हा मविआची बैठक होणार आहे. ही बैठक संपताच शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधला.

संजय राऊत म्हणाले की, महाविकास आघाडी एकजूट आहे. आमच्यात कोणताही वाद नाही. सुमारे सहा तास अतिशय



व्यवस्थित ४८ जागांवर आमची चर्चा पार पडली आहे. तर आगामी ३० जानेवारी रोजी आम्ही पुन्हा एकत्र बसू व सर्व जागांवर मार्ग काढला जाईल, त्यामुळे विरोधकांनी कितीही देव पाण्यात ठेवले तरी आम्ही मात्र एकजुटीने लढू, असा विश्वास राऊत यांनी व्यक्त केला.

(पान ४ वर)

## ईडीला सर्व माहिती दिली-रोहीत पवार

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य सरकारी बँकेत तत्कालीन संचालक मंडळानं चुकीच्या गोष्टी केल्या होत्या. त्याविरोधात समाजसेवक अण्णा हजारे आणि काहीजण न्यायालयात गेले होते. त्यावरून आर्थिक गुन्हे शाखा आणि ईडीनं कारवाई केली. या प्रकरणाशी माझा काहीही संबंध नाही. तरीही, ईडीला सर्व माहिती दिली आहे. अधिकारी त्यांचं काम करत आहेत. आम्ही चुकीच्या गोष्टी न केल्यानं घाबरत नाही. ईडीला सहकार्य करण्याची भूमिका आज होती, आताही आहे, उद्याही राहिल, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवारांनी म्हटलं आहे.

रोहित पवारांनी एका मराठी वृत्तवाहीनीशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. 'माझी चौकशी सुरू असताना शरद पवार राष्ट्रवादीच्या कार्यालयात १० ते ११ तास बसून होते. शरद पवार कार्यकर्त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहतात. त्यामुळे महाराष्ट्रात जसं लढत होतो, तसं आज आणि उद्याही लढणार आहे.'

'राजकीय वारसा हा विषय ठरवून होत नसतो. लोक राजकीय वारसा ठरवतात. शरद पवार मार्गदर्शक आणि प्रमुख म्हणून कार्यालयात उपस्थित होते. चौकशी सुरू असताना शरद पवार चिंतेत होते, पण तरीही तेथील कार्यकर्त्यांशी संवाद साधून पाठबळ देत होते,' असं रोहित पवारांनी सांगितलं.

## नाना पटोलेंना निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत

### प्रकाश आंबेडकरांच्या पत्रानंतर वाच्वता

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- राज्यातील महाविकास आघाडीमध्ये आणि इंडिया आघाडीमध्ये कुणाला घ्यायचं आणि कुणाला नाही याचा निर्णय घेण्याचा अधिकार काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना नसल्याचं समोर आलं आहे. वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकरांनी यासंबंधी एक पत्र लिहिलं होतं. त्यांच्या या पत्रानंतर काँग्रेसमध्ये एकच खळबळ उडाली आहे. काँग्रेसमध्ये निर्णय घेण्याचे अधिकार हे नाना पटोलेंना नसून अशोक चव्हाण आणि बाळासाहेब थोरात यांना असल्याचं समोर आलं आहे. राज्यातील महाविकास आघाडीमध्ये वंचितच्या प्रकाश आंबेडकरांनी सामील व्हावं, तशा आशयाचं पत्र आंबेडकरांना पाठवण्यात आलं होतं. त्या पत्रावर शिवसेनेचे संजय राऊत, (पान ४ वर)

## शरद पवारांच्या परवानगीने अजित पवारांनी शपथ घेतली होती

### राष्ट्रवादी आमदार अपात्रता सुनावणीदरम्यान सुनील तटकरेंचा दावा

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी आमदार अपात्रतेच्या प्रकरणावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी सुरु आहे. या सुनावणी दरम्यान राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे यांची उलटतपासणी घेण्यात आली. अजित पवार यांनी २०१९ मध्ये जी शपथ घेण्यात आली होती ती पक्षनेतृत्वाच्या म्हणजेच शरद पवार यांच्या सहमतीनेच घेतली होती असा दावा यावेळी सुनील तटकरे यांनी केलाय. अजित पवार यांनी पहाटे घेतलेला शपथविधी हा महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्वाच्या घडामोडींपैकी एक आहे. त्याच पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांची उलटतसापणी घेण्यात आली. यावेळी सुनील तटकरे यांनी हा दावा केला आहे.

अजित पवार गटाकडून विरेंद्र तुळजापूर हे युक्तिवाद करत आहे. तसेच शरद पवार गटाकडून शरण जेथयानी हे युक्तिवाद करतायत. आजची साक्ष आणि पवारांची उपस्थिती ह्यासाठी महत्वाची आहे कारण सुनील तटकरे यांनी आपल्या (पान ४ वर)




# राष्ट्रीय एकात्मतेसाठी निर्धार करू या!

प्रजासत्ताक भारताचा आज ७४ वा वर्धापन दिन साजरा करीत आहोत. परंतु इतक्या वर्षाच्या कालावधीत आपल्याला अपेक्षेइतकी राष्ट्रीय एकात्मता साध्य करता आली नाही. त्यामुळे आजच्या काळात राष्ट्रीय एकात्मता एक समस्येचा विषय निर्माण झाला आहे. आपला भारत विकसनशील देश आहे. या विकसनशील देशासमोर भाषेचा प्रश्न, धार्मिक तणाव, शिक्षणाचे माध्यम, जातीभेद, सतत पडणारा दुष्काळ, अतिरेक्यांचे आक्रमण, भरमसाठवाढणारी लोकसंख्या व त्यातच देशातील अंतर्गत धार्मिक कलह व तणाव इत्यादी अनेकगंभीर समस्या उभ्या राहिल्या आहेत. देशामध्ये समतेची भावना नसेल तर राष्ट्राचा विकास साधता येणार नाही व पर्यायाने आपलाही विकास साधता येणार नाही. म्हणूनच आजच्या काळात राष्ट्रीय एकात्मता व धार्मिक सहिष्णुतेची गरज आहे. राष्ट्रीय एकात्मता हे भारतीय समाजाचे महत्त्वाचे अंग आहे. समाजातील वैमनस्य शोधून ते दूर करणे आवश्यक आहे. भारतीय समाजातील वैमनस्याची कारणे धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय स्वरूपाची असू शकतील. परंतु ही कारणे कदाचित गैरसमज, पूर्वग्रह, अज्ञान व अंधश्रद्धा यामुळे निर्माण होतात. ही सद्यःस्थिती पाहून दिवसेंदिवस चिंतेची बाब होत चालली आहे. त्यामुळे आज राष्ट्रीय एकात्मतेला व धार्मिक सहिष्णुतेला बाधा येत चालली आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत या अपप्रवृत्तीचा व गैरसमज सर्व शक्तीनिशी बिमोड करणे आवश्यक आहे. हा बिमोड झाल्याशिवाय देशातील सर्व विभागांमध्ये ऐक्य, सलोखा व सामंजस्य निर्माण होणार नाही, याची जाणीव प्रत्येक नागरिकास असणे आवश्यक आहे.

आपआपसात बंधुभाव निर्माण करून हिताला प्राधान्य देण्याच्या वृत्तीला प्रेरणा देणारी मनोभूमिका तयार करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. तसेच राष्ट्रीय एकात्मतेतून धार्मिक सहिष्णुता, सामंजस्य व समभाव याचा विकास करून आपण सारे एकाच राष्ट्राचे आहोत, ही जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. आज देशापुढे उभ्या असलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी व राष्ट्रीय आकांक्षा पूर्ती करण्यासाठी आपल्याला दोन मार्गाचा अवलंब करता येईल. एक म्हणजे शिक्षण व दुसरे राष्ट्रीय एकात्मता. शिक्षणातून आपणास शक्ती मिळेल, तर राष्ट्रीय एकात्मतेमुळे पोषक वातावरण निर्माण होऊन आपली लोकशाही, आर्थिक सुबत्ता व लोककल्याण ही राष्टीय उद्दीष्टे साध्य होण्यास मदत होणार आहे. राष्टीय एकात्मतेला विघातक ठरणाऱ्या जातीयता, अस्पृश्यता, निरक्षरता या समस्यांचे महत्त्व महात्मा ज्योतिबा फुले, आगरकर, छत्रपती शाहू महाराज, महर्षि शिंदे, स्वातंत्र्यवीर सावरकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान समाज सुधारकांनी ओळखले होते. भविष्यकाळात राष्ट- एकसंघ ठेवायचे असेल तर या महान सुधारकांनी ज्या दृष्टीकोनातून समाजाकडे पाहिले, समाजाचा अभ्यास केला त्या दृष्टीकोनातून समाजाचे चिंतन करण्याची गरज आहे. भारतातील सर्व नागरिकांना देशबांधणीचे व देशविकासाचे कार्य उत्तम रितीने करता यावे व देशातील सर्व सामान्य जनता सुखी व्हावी, देश संपन्न व्हावा, राज्य सर्वार्थान कल्याणकारी व्हावे यासाठी राष्ट्रीय एकात्मता ही आज काळाची गरज आहे. राष्ट्रीय एकात्मता हे एक आव्हान आहे. भारतातील हे आव्हान प्रभावीपणे पेलण्यासाठी प्रजासत्ताक दिनी पुन्हा एकदा नव्या जोमाने निर्धार करू या!

# प्रजासत्ताक भारताचा पंचाहत्तरीत प्रवेश

**या** जगतातील लोकशाही स्वातंत्र्य शासन प्रणालीची आणि प्रजासत्ताक प्रणालीची निर्दोष पंचाहत्तरी पूर्णकारण्यास्तव अग्रेसर असलेला भारत एकमेव देश होय. भारत देशाची व भारत मातेची अस्मिता जपण्यासाठी आणि तिरंग्याची आन, बाण, व शान जपण्यासाठी प्रतेक भारतीय सज्ज असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. भारतीय प्रजासत्ताक राज्य टिकविण्यासाठी सर्व देश वासीयांनी राज्यकर्ते यांनी सर्वंकष प्रयत्न केलेले आहेत, गेल्या सात -साडे सात दशकापासून देशावर अनेक संकटे आली १९६२, १९६५, १९७२, १९९९, या वर्षात देशाला युद्धाला सामोरे जावे लागले, पण भारत थोडाही डगमला नाही. यामुळे भारताच्या विकासात जरूर अडथळा आला पण अगदी २०२४ वर्ष पर्यंत देश सक्षमपणे उभा आहे. नैसर्गिक संकटे, मानवी संकटे, परकीय संकटे अशी किती तरी संकटे झेलत देश पुढे, पुढे जात राहिला व जात आहे. १९४७ या वर्षी देश स्वतंत्र झाला. १९५०साली देश प्रजासत्ताक झाला. या काळात देशाने शैक्षणिक, वैज्ञानिक, भौगोलिक, क्षेत्रात खूप मोठी कामगिरी करून आम्ही जगतातील इतर देशा- सारखे प्रगतिशील राष्ट्र आहोत हे दाखवून दिले,हे सर्व देसवाशीयांच्या सहकार्य, सहभाग व सदभावना ने,

या काळात देशात अनेक विदारक, विघातक व दुर्दैवी घटना काही विघ्नसंतोषी तत्त्वांनी घडवून आणल्या. देशात बॉम्ब हल्ले, दहशतवादी हल्ले, देशांतर्गत सामाजिक हल्ले ही घडवून आणण्यात आले पण कणखर व राष्ट्रभक्त नागरिकांनी व प्रशासनकर्त्यांनी या सर्व विदारक स्थितीचा सामना करून देशाची एकता, अखंडता, बंधुता, समानता, सामाजिकता टिकवून ठेवली यातच देशाच्या विविधतेचे एकता सामावलेली आहे. देशाच्या शास्त्रज्ञानी विज्ञानाच्या विविध क्षेत्रात अतुलनीय कार्य करून आम्ही वैज्ञानिक क्षेत्रात कमी नाही हे जगाला दाखवून दिले. मित्रांनो आज देश तरुणांचा देश समजल्या जातो.

तरुणांनो ऊच्च शिक्षण प्राप्त करा, सक्षम व कर्तृत्वान व्हा, आपणाला जगाला दाखवून द्यावयाचे आहे की आमचा देश या भूतलावरील एक सामर्थ्य शाली देश आहे. उद्याचे या देशाचे उज्वल भवितव्य तरुणांच्या हाती आहे. ज्या देशाचे तरुण ऊच्च विद्या विभूषित, कर्तृत्व संपन्न व कार्य कुशल त्या देशाचे भवितव्य उज्वल असते हे कदापिही विसरू नका,आमच्या महिलांनाही आता जास्तीचे अधिकार मिळालेले आहेत. 'ज्या देशाची महिला सक्षम- तो देश सक्षम' हे कदापिही विसरू नका, महिला व पुरुष यांनी खांद्याला खांदा लावून कार्यकुशलता पाळली तर उद्या आपला देश जगातील एक सामर्थ्यशाली राष्ट्र गणल्या जाईल, उद्योग धंदे वाढवा, गृहुउद्योग, कृषी उद्योग, कृषी पूरक उद्योग उभारा, महिला बचत गट गठीत करा व देशाला विकसित राष्ट्र करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करा, विकसित महिला - विकसित भारत, विकसित तरुण-विकसित देश यासाठी सर्वंकष प्रयत्न करा, देश मोठा आहे.

आपण मोठे नाही, सर्वप्रथम देश व नंतर आपण आहोत हे विसरू नका, या प्रजासत्ताक दिनी विकसित भारत-विकसित देश करण्याचा संकल्प करू या.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# भारताची प्रतिज्ञा प्रत्येकाच्या मनात लहानपणीच रुजणे आवश्यक

**भारताला** सन १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले व २६ जानेवारी १९५० पासून संसदीय लोकशाही शासनपद्धती सुरु झाली. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आदर्श अशी भारतीय राज्यघटना तयार केली. १) लोकशाही, २) समाजवाद, ३) धर्मनिरपेक्षता हीच आपल्या राज्यघटनेची 'त्रिसूत्री' आहे. परंतु ७३ वर्षानंतर देखील वरील त्रिसुत्रीची अंमलबजावणी योग्य प्रकारे आपल्या देशात होऊ शकली नाही याची खंत वाटते.

संसदीय लोकशाही ही केवळ शासन पद्धतीचा एक प्रकार नाही तर ती एक जीवनपद्धती आहे, याची जाणीव भारतीय नागरिकांना अद्याप झालेली नाही. राज्यशास्त्राच्या नियमाप्रमाणे स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुभाव ही लोकशाहीची प्रमुख चार तत्त्वे आहेत ती समाजामध्ये लोकशाही यशस्वी होण्यासाठी पूर्णपणे रुजली पाहिजेत व नागरिकांना आपल्या हक्क व कर्तव्याची जाणीव असली पाहिजे. आपल्या देशात अद्यापही निरक्षरतेचे मोठे प्रमाण आहे. त्यामुळे सुसंस्कृत नागरिकांचे प्रमाण फार कमी आहे.

राष्ट-ीय धोरण राबविणे ही राज्यकर्त्यांची व नागरिकांची जबाबदारी असते. राष्ट्रीय जाणीवपूर्वक आपली कोणती राष्ट्रीय धोरणे आहेत हे नीट समजून घेतले पाहिजे. सध्या समाजाच्या सर्वच क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार निर्माण झाला आहे. परंतु भ्रष्टाचार हा काही वेळा अनेकजण मोघमपणे शब्द वापरत असतात. भ्रष्टाचार याचा नेमका अर्थ म्हणजे बेकायदेशीरपणे केले जाणारे वर्तन असा आहे.

घटनेची वरील सांगितलेली त्रिसुत्री राबविणे, लोकसंख्या नियोजन व प्रदूषणाला आळा घालणे, आपली राष्ट्रीय धोरणे यशस्वी करणे ही आपली सध्या सर्वांची जबाबदारी व कर्तव्य आहे. आपला भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. आपल्या देशाला मोठी प्राचीन सांस्कृतिक परंपरा आहे. प्राचीन रामायण व महाभारताचा सांस्कृतिक वारसा आहे, जो जपला पाहिजे. त्यानंतर मौर्यकालीन सम्राट अशोक, गुप्तकालीन समुद्रगुप्त व विक्रमादित्यासारखे श्रेष्ठ राज्ये होऊन गेले. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली अनेक देव-देवतांची धार्मिक स्थळे व मंदिरे ही आपल्या संस्कृतीची भूषणे आहेत.

मध्ययुगीन इ. स. बाराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतची मोगल साम्राज्याची राजवट ही देखील भारतीय संस्कृतीचाच ठेवा आहे, याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. सम्राट अकबराच्या काळातील फत्तेपूर सिक्री येथील सुंदर इमारती व शहाजहान बादशहाने आग्रा येथे बांधलेला ताजमहाल व नवी दिल्ली येथील लाल किल्ला हे मोगल कालीन संस्कृतीचे सुंदर नमुने आहेत. मोगलकालीन संस्कृती हा भारतीय संस्कृतीचाच वारसा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जलदुर्ग व रायगडाची उभारणी केली व हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. प्रतापगडावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण पं. जवाहरलाल नेहरु यांनी केले. याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. भारताच्या सर्व राज्यामधून विविध प्रकारची 'पिके' पिकविली जातात. सर्व प्रांतामधून अफाट सृष्टीसौंदर्य पसरले आहे. हिंदू - मुस्लिम, शीख, पारशी, बौद्ध व जैन, ख्रिश्चन इत्यादी अनेक धर्मांचे व असंख्य जातीचे लोक भारतात प्राचीन काळापासून राहत आहेत. त्याचप्रमाणे हिंदी, इंग्रजी, ऊर्दू, मराठी, गुजराथी, तामिळ व कन्नड इत्यादी बहुभाषा व बोली बोलणारे कोट्यावधी लोक भारतात राहत आहेत. भारतीय संघराज्याची ही सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक विविधेतील एकता टिकवून ठेवण्यासाठीच घटनाकारांनी धर्मनिरपेक्षता हा अतिशय महत्त्वाचा असा घटनेचा मानदंड मानला आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर पन्नास वर्षाच्या काळात भारतीय समाजामध्ये अनेक धर्मामध्ये व जातीमध्ये बेकायदेशीरपणे संघर्ष चालू आहेत. 'धर्मनिरपेक्षता' या तत्त्वाची दखल न घेता हिंदू व मुस्लिम जमातीमध्ये संघर्ष चालू आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे. सध्या शाळेमधून सर्वत्र प्रार्थनेच्यावेळी दररोज विद्यार्थी जी प्रतिज्ञा म्हणत असतात ती खरोखरच अर्थपूर्ण अशी आहे.

**भारत माझा देश आहे.**
**सारे भारतीय माझे बांधव आहेत.**
**माझ्या देशावर माझे प्रेम आहे.**
**माझ्या देशाच्या विविधतेने**
**नटलेल्या परंपरेचा**
**मला अभिमान आहे.**
**त्या परंपरेचा पाईक होण्याची**
**पात्रता माझ्या अंगी यावी**
**म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.**

ही प्रतिज्ञा सर्व शालेय विद्यार्थ्यांच्या मनामनातून रुजली पाहिजे व तिचे सुसंस्कार कायम स्वरुपाचे त्यांच्या मनावर टिकून राहिले पाहिजेत. आपण मागील पन्नास वर्षात ज्या चुका केल्या त्यासंबंधी अंतमुर्ख होऊन येणाऱ्या एकविसाव्या शतकात बलशाली 'माझा भाारत महान' बनविण्यासाठी झालेल्या चुका सुधारुन प्रयत्न केले पाहिजे. सध्या समाजातील अनेक लोक जगण्यासाठी केवळ जगत असतात. परंतु केवळ जगणे हेच मानवी जीवनाचे उद्दिष्ट नसावे. तर समाजात आपण सुसंस्कृत व संस्कृतीसंपन्न लोकशाही जीवन पद्धती जगण्याची अपेक्षा या प्रजासत्ताकदिनी ठेऊ या.

# स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजावणारा प्रजासत्ताक दिन

**स्वातंत्र्याचा अनुभव प्रत्येक नागरिकास नीट घेता यावा म्हणून आपण आपली प्रजासत्ताक पद्धती सुरू केली. त्या प्रजासत्ताक दिनानिमित्त केलेले हे एक विचार मंथन...**

भारतासारख्या खंडप्राय देशाने २६ जानेवारी १९५० रोजी एका लिखित स्वरूपातील घटना स्वीकार करून १५ ऑगस्ट १९४७ रोजी म्हणजेच साडे एकोणतीस महिन्यांपूर्वी मिळालेल्या स्वातंत्र्यातून देश अधिक गतिमान, विकसनशील आणि समृद्ध बनविण्याच्या उद्देशाने आणखी एक पाऊल पुढे टाकले. भारताच्या राष्ट-जीवनात २६ जानेवारी १९५० हा दिवस सर्वाधिक महत्त्वाचा असा आहे. कारण या दिवशी आपण स्वत:च निर्मिलेल्या मार्गावरून आपली मार्गक्रमणा सुरू झाली. आज ७४ वर्षानंतर आपल्या राष्ट-जीवनाच्या वाटचालीत मागे वळून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्या ७४ वर्षांत आपण घेतलेल्या बरेवाईट निर्णयांचा आढावा घेऊन झालेल्या चुकांचे परिमार्जन करण्याचे प्रयत्न करायला हवेत जेणेकरून देशाच्या प्रगतीमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही हे पाहण्याची आज नितांत गरज आहे. घटनेची मूळ संकलपना समजावून घेऊन आपण त्यानुसार योग्य पद्धतीने अंगीकार केला आहे का? की आपण त्यामध्ये अधिक संशोधन करून आता घटनेचे पुनर्लेखन करण्याची गरज आपल्याला वाटू लागली आहे? नक्की आपण कोणत्या स्थितीत आहोत हे तपासून पाहण्याची गरज आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येक भारतीय मोकळ्या हवेत श्वास घेऊ शकेल. प्रत्येक भारतीय खऱ्या अर्थाने स्वतंत्र होईल, दूधदुभते भरपूर प्रमाणात उपलब्ध होईल. संपूर्ण भारतात रामराज्य नांदेल, कुठेही व्देष, स्वार्थ, हिंसा, लुटालूट, मारामारी, बलात्कार, भ्रष्टाचार, पोलिसांचा अमानुष क्रूरपणा यांचा लवलेषही दिसणार नाही अशी स्वप्नं महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद यांनी देशवासीयांना दाखवली होती. पोलिस देशद्रोहींचा कर्दनकाळ तर देशभक्तांचे सेवक म्हणून वागतील, राजकीय नेते गांधीवादाच्या मार्गाने जातील, राष्ट-हितासाठी सर्वतोपरीने झटतील, त्यांच्या अंगी वैयक्तिक स्वार्थाचा शिरकाव होणार नाही यासारखीही स्वप्नं त्यांनी देशवासीयांना दाखवली, परंतु या गोष्टी केवळ स्वप्नवतच राहिल्या म्हणूनच प्रत्येक भारतीयाने आता तरी थोडं थांबून विचार करायला हवा. सरदार भगतसिंग, अशफाक, उल्लाह, चंद्रशेखर आझाद यांच्यासह शेकडो देशभक्तांनी भारतीयांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केलेले समर्पण आपण असेच वाया जाऊ देणार का? की आज या वळणावर भारतीय जनमानस स्वातंत्र्याचा खरा अर्थच विसरून गेले आहेत? जरा विचार करा की ज्यांच्यासाठी स्वातंत्र्य मिळविले त्यांना ते मिळाले काय? याचा विचार आपण करायलाच हवा. कोणे एके काळी आपण पारतंत्र्यातील भारतात आपला तिरंगा फडकविण्यासाठी जिवाची बाजी लावत होतो. आज मात्र याच तिरंग्याचा मान आपण ठेवत नाही असेच सर्वत्र दिसून येत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी वंदे मातरम् म्हणत देशभरातील ठिकठिकाणी प्रभातफेऱ्या काढल्या जायच्या आणि त्याव्दारे जनसामान्यांमध्ये स्वातंत्र्य आंदोलनाचे स्फुल्लिंग चेतविण्याचा प्रयत्न केला जात होता. मात्र आता वंदे मातरम् फिल्मी ढंगाने गाऊन अवमानकारकरित्या म्हटले जाते. ही बाब गंभीर असून, एक प्रकारे राष्ट-ीय प्रतीकाचा घोर अपमानच पदोपदी केला जात आहे, असे म्हणायला हवे.एखाद्या सत्यवचनी, सज्जन, इमानदार व्यक्तीला जर धमक्यांपासून बचावण्यासाठी पोलीस संरक्षण हवे असेल तर ते त्याला मिळू शकत नाही. अशी आजची स्थिती आहे. गुन्हेगारांनी निवडणूक लढवू नये यादृष्टीने जेव्हा निवडणूक आयोग काही ठोस उपाययोजना करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा सर्व पक्षांतील आपले लोकप्रतिनिधी त्याचा विरोध करण्यासाठी एकत्र येतात असे दिसून येते. लोकसंख्या ही देशाची मुख्य समस्या असताना ती आटोक्यात आणण्यासाठी उपाय योजण्याऐवजी आपले लोकप्रतिनिधी याचेही राजकारण करतात. त्यामुळेच आपल्या देशाची लोकसंख्या सव्वा अब्ज इतकी अवाढव्य झाली आहे. आज सत्य, अहिंसा, राष्ट-वाद, समाजवाद, गरिबी निर्मूलन, गांधीवाद, ग्रामीण विकास यासारखे शब्द केवळ पुस्तकातच वाचायला मिळतात, अशीच स्थिती आहे.

दहशतवादामुळे देशभर भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे. इस्लामी दहशतवाद भारतीय मुलींनी पडदा पद्धतीतच गुदमरून जावे यासाठी मुलींवर ॲसिड फेकून त्यांना पडदा पद्धत स्वीकारण्यास भाग पाडले जातेय. त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचाच हा घृणास्पद प्रकार आहे. विशेष म्हणजे यांसारख्या घटना घडूनही मुस्लिम मतांचे राजकारण केले जाते, या घटनांचा साधा निषेधही कुणी व्यक्त करत नाही. देशाच्या सीमाही सातत्याने संकुचित होत आहेत, असुरक्षित होत आहेत. देशाला बळकटी प्राप्त करून देणाऱ्या गोष्टीतही हीन पद्धतीचे राजकारण केले जाते. याबाबत काही उपाययोजना केल्या तर आपल्याच देशातील राजकीय पक्ष त्याला कडाडून विरोध करतात. या कपाळकरंटेपणाला काय म्हणावे?

मौर्यकालीन सम्राट अशोक, गुप्तकालीन समुद्रगुप्त व विक्रमादित्यासारखे श्रेष्ठ राज्ये होऊन गेले. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली अनेक देव-देवतांची धार्मिक स्थळे व मंदिरे ही आपल्या संस्कृतीची भूषणे आहेत. मध्ययुगीन इ. स. बाराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतची मोगल साम्राज्याची राजवट ही देखील भारतीय संस्कृतीचाच ठेवा आहे, याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. सम्राट अकबराच्या काळातील फत्तेपूर सिक्री येथील सुंदर इमारती व शहाजहान बादशहाने आग्रा येथे बांधलेला ताजमहाल व नवी दिल्ली येथील लाल किल्ला हे मोगल कालीन संस्कृतीचे सुंदर नमुने आहेत. मोगलकालीन संस्कृती हा भारतीय संस्कृतीचाच वारसा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जलदुर्ग व रायगडाची उभारणी केली व हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली.

**-डॉ. सूर्य प्रकाश अग्रवाल**

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली

**२६** जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते. कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने गरजेचे आहे.२६ जानेवारी१९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली. त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी शासन. भारतात जात,धर्म,पंथ,वंश,गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुन्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी१९५० रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो. आपण ७४ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत. मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो. भारताला स्वतंत्र होऊन ७४ वर्षे झाली असली तरीही आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बॅंक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार, यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल. अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी, भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला.भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा उगम झाला एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७५ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं,वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम-सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल. याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती दाबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबांच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे.यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७४ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा.यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देश भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना आदरांजली ठरेल. देशात वाढते प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल.भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद! **- रमेश कृष्णराव लांजेवार**

# वैजापूर शहरात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जनजागृती फेरी




वैजापूर, दि. २५ (प्रतिनिधी) - मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, नको जात, नको धर्म, मतदान आपले श्रेष्ठ कर्म, लोकशाही वर निष्ठा ठेऊ- मतदानाचा हक्क बजऊ, राष्ट्रीय मतदार दिनाचा विजय असो,अशा घोषणा देत जि.प. मुलींची प्रशाला चे विद्यार्थी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासून जागर करीत गुरुवार(ता. २५)रोजी फेरी काढून मतदारांना जागृत केले,तहसीलदार सुनील सावंत व स्वच्छता दूत तथा मतदार जागृत प्रशिक्षक धोंडीरामसिंह राजपूत यांनी या फेरीला ध्वज दाखविला. तहसील कार्यालयात पोहचल्यावर धोंडीराम सिंह राजपूत यांनी तेथील सर्वांना राष्ट्रीय मतदार दिवस प्रतिज्ञा दिली. या प्रसंगी मुख्याध्यापक एस.के. पगार, जी.यु.चौकडे, एस.सी. निकाळे, दिपक त्रिभुवन, कैलास वैद्य, व्ही.सी. दह्याटे, एन, एस ,भोये,बी,एस चव्हाण,यांच्या कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्ही.पी. कॉलेजमध्ये एक दिवशीय राष्ट्रीय मतदार जनजागृती कार्यशाळा

वैजापूर, दि. २५ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय मतदार दिवस निमित्त येथील व्ही.पी. कॉलेजमध्ये गुरुवार (ता.२५) रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागृती कार्यशाळा, युवक मतदारांचे मतदान बाबत जागृती, प्रत्यक्ष डमी मतदान करून मतदान प्रक्रिया प्रात्यक्षिक सह दाखविणे १८ वर्षावरील युवा मतदारांना मतदार यादीत नाव नोंदणी करण्याचे आवाहन व मतदानविषयी मतदार साठी ची प्रतिज्ञा असे विविध उपक्रम राबवून राष्ट्रीय मतदार दिन संपन्न करण्यात आला, या कार्यक्रमात तहसीलदार सुनील सावंत यांनी या बाबत मार्गदर्शन करतांना विशद केले की,सर्व पात्र मतदार यांनी स्वतः तर मतदान करावे परंतु आपल्या कुटुंबासह शेजारी पाजारी यांनाही मतदान करण्यास प्रवृत्त करावे असे आवाहन केले व राहीलेल्या १८वर्षवरील सर्वांनी मतदार यादीत नाव नोंदवून घ्यावे. प्राचार्य डॉ. शिवाजीराव थोरे यांनीही मतदान सक्तीचे



असावे व मतदार यादीतील सर्वांनी मतदान कारण्यासाठी युवकांनी त्यांना मतदान महत्व सांगावे असे आवाहन केले आहे.

निवडणूक तज्ज्ञ प्रशिक्षक धोंडीरामसिंह राजपूत यांनी पुढील घोषवाक्य उच्चरात 'युवा मतदार-लोकशाही दमदार' व युवकांचें मतदान लोकशाही चा सन्मान' 'मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो' म्हणून युवकांना मतदान महत्व समजावून सांगून युवा मतदार यांनी येणाऱ्या काळात सर्वच निवडणुक-प्रकियेत स्वतः मतदान करावें व इतरानाही मतदान करण्यास प्रवृत्त करावे असे आवाहन केले'कार्यक्रम सूत्र संचलन, प्रा.एन. व्ही. खंदारे यांनी केले.

तर प्रास्ताविक डॉ.आबासाहेब कसबे यांनी केले. या प्रसंगी उप प्राचार्य डॉ. संदीप परदेशी व राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तदनंतर प्रा. काळे यांनी इलेक्ट्रॉनिक यंत्रद्वारे काळे यांनी ईक्ट्रॉनिक यंत्र द्वारे मतदान करण्याच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष मुलां-मुलींनी डमी मतदान करून व्हीव्हीपॅट पध्दतीने मतदान नोंद कशी होते ते जाणून घेतले.

# प्रपंचातील सर्व प्रश्न, समस्या व अडचणीची उत्तरे म्हणजे रामकथा-हभप रामराव ढोक महाराज

वैजापूर, दि. २५ (प्रतिनिधी) - मनुष्य जीवनातील प्रपंचात निर्माण होणाऱ्या, समस्या, प्रश्न व अडचणीची समर्पक उत्तरे म्हणजे रामकथा होय असे प्रतिपादन रामायणाचार्य हभप रामराव ढोक महाराज यांनी येथील जि.प. प्रशालेच्या मैदानावर सुरू असलेल्या रामकथेचे तिसरे पुष्प गुंफताना बुधवार (ता.२४) रोजी केले.

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त माजी आमदार भाऊसाहेब पा. चिकटगावकर यांनी आयोजित या कार्यक्रमात ढोक महाराज पुढे म्हणाले की, देशातील वृद्धाश्रमात ज्यांनी आपल्या वृद्ध आई -बापाना ठेवले त्यांनी जर रामकथा ऐकल्या तर ते दाम्पत्य या जन्मदात्याना घरी आणून त्यांना विठ्ठल-रुक्मीनी मानून सेवा केल्या शिवाय राहणार नाहीत, असेही महाराज म्हणाले यासाठी त्यांनी या



रामकथा एकणाऱ्या लातूर येथील दाम्पत्याचे उदाहरण दिले, आशीर्वाद बाबत ते म्हणाले की,' मागितल्या नंतर जे मिळते ते आश्वासन असते तर आणि जे न मागता मिळते त्याला आशीर्वाद म्हणतात'. या रामकथेला बुधवार रोजी नांदेड चे माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, व पालिका प्रशासक भागवत बिघोत यांनी भेट दिली. आयोजक भाऊसाहेब पा. चिकटगावकर यांनी त्यांचे स्वागत केले.

या प्रसंगी हभप संजय महाराज जगताप, सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपुत, मनसुख झाम्बड, मनाजी पा. मिसाळ, शिवसेना तालुका प्रमुख सचिन वाणी, शहर अध्यक्ष प्रकाश चव्हाण, माजी उपसभापती राजेंद्र मगर, सरपंच उत्तम निकम, जेष्ठ नेते रूउफ दादा सय्यद, तालुका संघटक मनोज पा. गायके, उपजिल्हाप्रमुख मनोज न्हावले, बापू आहेर, साईनाथ मतसागर, अजय पा, ािचाकटगावकर, उपतालुकाप्रमुख मोहन साळुंके, भाऊसाहेब पा. गलांडे, तालुका समन्वयक प्रशांत शिंदे, विलासराव मोरे, दादा मामा गायकवाड, सचिन कुंदे, अमोल बावचे, अक्षय साठे, बापू साळुंके, लखन त्रिभुवन, ऋषी राजपूत, अनिल धुळे, रवींद्र धोरडे, अशोक आप्पा पवार, लिमेश वाणी, देविदास वाणी तसेच रामभक्त व ग्रामीण -शहरी भागातील महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कथेची वेळ सायंकाळी साडेसहा वाजताची आहे.

# गंगेच्या पवित्र घाटावर स्नान करणाऱ्या महिलांचे व्हिडिओ आणि छायाचित्रे काढण्यावर बंदी घालावी

नवी दिल्ली, दि. २५ महिलांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवण्यासाठी महिला आणि अल्पवयीन मुलींचे अश्लील आणि अनधिकृत व्हिडिओ, छायाचित्र सोशल मीडियावर प्रसारित करणाऱ्या हिरो सिटी व्लॉग, हरिद्वार व्लॉग, गोविंद यूके व्लॉग, अदभूत व्लॉग, शांती कुंज हरिद्वार व्लॉग आणि इतर दोषींवर भा.दं.वि. संहितेच्या कलम ३५४ण/५०९, माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम 66E/67/67A आणि पोक्सो कायद्याच्या कलम १४ नुसार कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पंजाब, मोगा येथील अधिवक्ता अजय गुलाटी आणि हिंदु जनजागृती समितीच्या दिल्ली येथील अधिवक्त्या अमिता सचदेवा यांनी राष्ट्रीय महिला आयोग आणि उत्तराखंड राज्य महिला आयोगाकडे केली आहे.

या तक्रारीत पुढे म्हटले आहे की, डिजिटल, तसेच सामाजिक माध्यमांवर सध्या मोठ्या प्रमाणावर समाजाला हानीकारक आणि आक्षेपार्ह मजकूर प्रसारीत केला जात आहे. यात आता प्रामुख्याने वेगवेगळ्या व्लॉगर्सकडून पैशाच्या लालसेपोटी पवित्र गंगा नदीत स्नान करणाऱ्या महिलांचे गुप्तपणे व्हिडिओ-रील-शॉर्ट्स बनवणे, छायाचित्रे काढणे आणि त्यांच्या संमतीशिवाय विविध इंटरनेट माध्यमांवर प्रसारित केले जात

**हिंदू जनजागृती समितीची मागणी !**

आहेत. या प्रकारांमुळे समाजातील अनेक महिलांना त्यांचे कुटुंब, नातेवाईक आणि मित्रांसमोर अपमानास्पद परिस्थितीला सामारे जावे लागते, लज्जा निर्माण होते. तसेच त्या व्हिडिओ-छायाचित्रांच्या खाली लिहिलेल्या अश्लील अन् आक्षेपार्ह प्रतिक्रियांमुळे (कमेंट्समुळे) त्यांच्या प्रतिष्ठा अन् प्रतिमेला तडे जात आहेत. अशा असंख्य अनोळखी व्यक्तींकडून होणारा असा छळ आणि अपमान कोणतीही सभ्य महिला कधीही सहन करू शकत नाही. असे व्हिडिओ-छायाचित्र हे सुसंस्कृत समाजावर काळा डाग आहे. त्यामुळे गंगा नदीच्या उगमापासून गंगासागरपर्यंतच्या विभिन्न पवित्र घाटांवर व्हिडिओग्राफी आणि छायाचित्रे काढण्यास शासनाने तात्काळ बंदी घालण्याची आवश्यकता आहे. तसेच असे कृत्य करणाऱ्या दोषींच्या यू-ट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम आदी सामाजिक अथवा अन्य इंटरनेट माध्यमांवरील सर्व आक्षेपार्ह व्हिडिओ, छायाचित्रे, रील्स आणि शॉर्ट्स काढून टाकण्याच्या सूचना शासनाने तात्काळ निर्गमित केल्या पाहिजे.

महिला अथवा लहान मुलींची बदनामी करणारे व्हिडिओ-छायाचित्रे ज्यांनी इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांवर अपलोड केले आहेत त्यांना केवळ आर्थिक दंडच नव्हे, तर त्यांच्या या गंभीर गुन्हेगारी कृत्यांसाठी भा.दं.वि. संहितेच्या अंतर्गत खटला भरला पाहिजे आणि त्यांना कठोर शिक्षा द्यायला हव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# महिला व बालविकास विभागाची क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - महिला व बालविकास विभागामार्फत अनाथ अथवा ज्या बालकांच्या पालकांचा पत्ता लागत नाही अशा बालकांचे संगोपन करण्यासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना राबविली जाते. या योजनेचा गरजूंनी लाभ घ्यावा,असे आवाह जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव यांनी केली आहे.

**योजनेचे स्वरुप -** या योजनेअंतर्गत दि.१ एप्रिल २०२३ पासुन २२५० रुपये प्रति बालक प्रति महिना लाभ दिला जातो. हा लाभ बालकाच्या वयाच्या १८ वर्षापर्यंत देण्यात येतो. योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच तालुकास्तरावर संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), अभय केंद्र, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय येथे करावा.

**लाभार्थी निकष -**

१) अनाथ, किंवा ज्याच्या पालकांचा पत्ता लागत नाही, व जी दत्तक घेणे शक्य होत नाही, अशी बालके,

२) एक पालक असलेली बालके, मृत्यू, घटस्फोट, विभक्तीकरण, परित्याग, अविवाहीत मातृत्व, गंभीर अजार, पालक रुग्नालयात असणे इ. कारणामुळे विघटीत झालेल्या एक पालक असालेल्या कुटूंबातील बालके, कुष्ठरुग्ण व जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैदयांची बालके, एच. आय. व्ही. ग्रस्त / बाधित बालके, तीव्र मतिमंद बालके, दोन्ही पालक अपंग आहेत अशी बालके.

३) पालकांमधीत तीव्र वैवाहिक बेबनाव, अती हेटाळणी व दुर्लक्ष, न्यायालयीन किंवा पोलीस तक्रार प्रकरणात

**अशी अपवादात्मक परिस्थीतील बालके**

४) शाळेत न जाणारे बाल कामगार (कामगार विभागाने सुटका व प्रमाणित केलेले)

**सोबत जोडावयाची कागदपत्रे:-**

१) आधार काडे (पालकाचे व बालकाचे)

२) निवासाचा पुरावा - रेशन कार्ड/लाईटबील/पाणी पट्टी/घरपट्टी पावती/ नगरपालीकेचा / नगरसेवकाचा रहिवासी

**दाखला यापैकी एक**

३) उत्पन्नाचा दाखला चालु वर्षाचा - तहसिलदार यांचा दाखला / पगार पत्रक / पालकाच्या कार्यालयाचा दाखला

(पालकाचे पद लिहावे)

४) बालकाचा जन्माचे दाखला

५) शाळेत प्रवेश घेतल्याबाबतचे बोनाफाईड सर्टीफिकेट्स ओरिजनल (चालु वर्षाचा द्यावा)

६) राष्ट्रीयकृत बॉकेचे पासबुक (पालकाचे / बालकाचे)

७) पालकासमवेत मुलांचा घरासमोर काढलेला फोटो (०४ प्रती 4X6)

८) मृत्यु प्रमाणपत्र (बालकाच्या आई किंवा वडीलाचे अथवा दोन्ही )

९) बंदी असल्यास शिक्षा भोगत असल्याचे पत्र / प्रमाणपत्र

१०) इतर कागदपत्रे (समिती / कार्यालयाने सूचविल्यानुसार)

११) दुर्धर अजार, अपंग, मतिमंद, असल्यास दवाखान्याचे प्रमाणपत्र आणि घटस्पोटीत असल्याचे कोर्टाचे आदेश.

गरजू व इच्छुकांपर्यंत माहिती पोहोचवून लाभ घेण्यासाठी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव यांनी केले आहे.

**- संकलन**
जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाची योजना: गाईच्या दुधाला ५ रुपये प्रति लिटर अनुदान

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - विभागातील व जिल्ह्यातील सहकारी दुध संघ, खाजगी प्रकल्पांना दुध पुरवठा करणाऱ्या दुध उत्पादक शेतकऱ्यांना गाईच्या दुधासाठी प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्याची योजना पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागामार्फत राबविण्यात येत असल्याची माहिती प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी रि. भा. मते यांनी दिली आहे. तसेच पशुसंवर्धन विभागामार्फत जनावरांचे ईअर टॅगींग मोहिम राबविण्यात येत आहे. तरी दुध पुरवठा करणाऱ्या पशुपालकांनी आपल्या जनावरांचे टॅगींग करुन घ्यावे,असे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी दुध खरेदी दराच्या चढ उतारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत राज्यातील सहकारी दुध उत्पादक संघ, खाजगी प्रकल्प यांना गाईचे दुध पुरवठा करणाऱ्या दुध उत्पादकांना प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्याचा निर्णय दि.५ जानेवारी रोजी निर्गमित करण्यात आला आहे. ही योजना दि.११ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संबंधित संघ व खाजगी प्रकल्प यांनी ३.५ फॅट/८.५ एस.एन.एफ. या गुणप्रतिच्या दुधासाठी प्रति लिटर २७ रुपये दर देणे आवश्यक आहे. किमान ३.२ फॅट/८.५ एस.एन.एफ पर्यंतच्या दुधासाठी ही योजना लागू आहे. त्यापेक्षा कमी अथवा जास्त गुणप्रत असल्यास प्रत्येकी ३० पैसे प्रमाणे वजावट अथवा वाढ करणे आवश्यक आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सॉफ्टवेअर तयार करण्यात आले असून प्रति लिटर पाच रुपये अनुदान संबंधित शेतकऱ्याच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. थेट बँक खात्यात अनुदान जमा होण्यासाठी दुध उत्पादक शेतकऱ्याचे बँक खाते आधार कार्ड व ईयर टॅग शी जोडलेले असणे आवश्यक असून त्याची भारतीय पशुधन पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.

विभागातील एकूण १२ सहकारी संघ, एक मल्टीस्टेट संघ, २ फर्मर प्रोड्युसर कंपनी, ४६ खाजगी दुध प्रकल्प अशा एकूण ६१ संस्थांना गाईचे दुध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना हा लाभ मिळेल. पशुसंवर्धन विभागामार्फत जनावरांचे ईअर टॅगींग मोहिम राबविण्यात येत आहे. तरी दुध पुरवठा करणाऱ्या पशुपालकांनी आपल्या जनावरांचे टॅगींग करुन घ्यावे,असे आवाहन प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी रि.भा.मते, प्रादेशिक सह आयुक्त (पशुसंवर्धन) डॉ. एन.ए. सोनवणे, प्रादेशिक सह आयुक्त (पशुसंवर्धन) डॉ. संजीव गायकवाड यांनी केले आहे.

# महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा रविवारी ( दि.२८ )

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार दि.२८ रोजी महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा -२०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे दोन परीक्षा केंद्रांवर ६२४ उमेदवारांची परीक्षा देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षेच्या कामकाजासाठी ८८ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आली आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांनी दिली आहे. ही परीक्षा सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळात होणार आहे.

**परीक्षा केंद्र याप्रमाणे-**

१. एमजीएम पॉलिटेकनिक महाविद्यालय, एन ६, सिडको, सेंट्रल नाक्याजवळ, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ येथे २८८ परीक्षार्थी.

२. एमजीएम जवाहरलाल नेहरु इंजिनिअरींग महाविद्यालय, एन ६, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ येथे ३३६ परीक्षार्थी.

**परीक्षार्थीसाठी सुचना :-** परीक्षार्थींनी परीक्षेस येतांना ओळखीचा पुरावा (स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, स्मार्टकार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायसन्स यापैकी कोणतेही एक) परीक्षा कक्षात उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र, काळ्या शाईचे बॉलपेन, ओळखपत्र, ओळखपत्राची छायांकीत प्रत या व्यतिरिक्त अन्य कोणतेही साहित्य अथवा वस्तू घेऊन जाण्यास परवानगी नाही. तसेच डिजीटल डायरी, मायक्रोफोन, मोबाईल, ब्लू टूथ, कॅमेरा फोन अन्य तत्सम संदेशवाहक उपकरण, इलेक्ट्रॉनिक साहित्य परीक्षा कक्षात नेण्यास मनाई आहे, असेही उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांनी कळविले आहे.

# प्रजासत्ताक दिन : मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा आज ( दि.२६ ) पालकमंत्र्यांच्या हस्ते

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा शुक्रवार दि.२६ रोजी सकाळी सव्वा नऊ वा. देवगिरी मैदान येथे होणार आहे. राज्याचे रोहयो व फलोत्पादन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या शुभ हस्ते हे ध्वजारोहण होणार आहे. या सोहळ्यास स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक राजकीय कार्यकर्ते,शासकीय अधिकारी- कर्मचारी, विद्यार्थी, नागरिकांनी उपस्थित रहावे,असे आवाहन जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय व विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनी केले आहे.

मुख्य शासकिय सोहळ्यात अधिकाधिक नागरिकांना सहभागी होता यावे यासाठी ध्वजारोहणाचे कोणतेही शासकीय, अर्धशासकीय समारंभ सकाळी साडेआठ ते १० वा. दरम्यान आयोजित करु नये. अशा संस्थांनी ध्वजारोहणाचे कार्यक्रम सकाळी साडेआठ वा. पूर्वी किंवा १० वा. नंतर आयोजित करावे असे उपायुक्त जगदीश मिनीयार यांनी कळविले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# राष्ट्रीय मतदार दिवस; सर्वांगिण उन्नतीसाठी लोकशाही व्यवस्था आवश्यक-डॉ.सुधीर गव्हाणे

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- लोकशाही व्यवस्था म्हणजे वंचितांना सत्ता, प्रतिष्ठा आणि प्रगतीची संधी देणारी व्यवस्था. आपल्या देशात महिलांचे सबलीकरण, प्रत्येक माणसाला समान मताचा अधिकार अशा अनेक अधिकारांची प्राप्ती लोकशाहीमुळेच होऊ शकली. लोकशाही व्यवस्था ही सर्वांगिण उन्नतीसाठी आवश्यक असणारी व्यवस्था आहे,असे प्रतिपादन ज्येष्ठ अभ्यासक, माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे यांनी आज येथे केले.



राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते,उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ, प्रभोदय मुळे, अर्चना खेतमाळीस, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षाराणी भोसले, सुचिता शिंदे, प्रगती चोंडेकर आदी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त उपस्थितांना शपथ देण्यात आली. निलेश कड वर्षिप अर्थ फाऊंडेशन यांच्या वतीने जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले. मतदार यादी पुनरिक्षण, अद्यावतीकरण तसेच नवमतदार नोंदणीसाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी – कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच चित्रकला, निबंध, घोषवाक्य, शॉर्ट फिल्म स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच नवमतदारांना मतदार ओळख कार्ड वितरीत करण्यात आले.

डॉ. गव्हाणे म्हणाले की, लोकशाही रक्षणाची, संवर्धनाची जबाबदारी ही लोकांची असते. कोणत्याही रक्तपाताशिवाय आर्थिक सामाजिक क्रांती करण्याची शक्ती लोकशाही व्यवस्थेत आहे.देशाचे मानवी भांडवल सक्षम करुन ते विकास प्रक्रियेत सहभागी करुन देशाची प्रगती साधणे हे लोकशाही व्यवस्थेचे उद्दिष्ट असते, असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, वस्तूत; प्रत्येक व्यक्तिला समान मताचा अधिकार ही एक क्रांती होय. भारताची लोकशाही ही समावेशक लोकशाही असून विविध विचारधारांचे राजकीय पक्ष हे बहुविधतेचे प्रतिक होय. लोकशाहीचे जतन हेच देशाचे जतन असून मतदानाचा अधिकार बजावून आपणास हे जतन करावयाचे असते. अहिंसा हा लोकशाहीचा आत्मा आहे,असे त्यांनी सांगितले.

डॉ. लोखंडे म्हणाले, मतदानाचा अधिकार बजावणे अत्यंत आवश्यक आहे. मतदानाबाबत अजिबात हलगर्जीपणा करु नये.आपल्या देशात अन्य देशांच्या तुलनेत खूप चांगली स्थिती आहे. दिवसेंदिवस आपली लोकशाही प्रगल्भ होत आहे.

नायब तहसिलदार संभाजी थोटे यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीत आणि राज्यगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## भरधाव पीकअप व्हॅनच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू; चालक वाहन सोडून फरार

सिल्लोड दि.२५ (प्रतिनिधी)- तालुक्यातील वांगी फाट्यावर आज दुपारी १२. ३० वाजेच्या दरम्यान भरधाव जाणाऱ्या पिकअप व्हॅनने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिली. यात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. दिगंबर रामराव काकडे ( ४१ रा.धानोरा ता.सिल्लोड) असे मृताचे नाव आहे.

आज दुपारी दिगंबर रामराव काकडे हे दुचाकीवरून ( क्र. एम एच २० ए झेड ६४५५ ) भराडी कडे जात होते. तर भराडीकडून एक पिकअप व्हॅन ( क्र. एम एच ०४ एफ डी ९५६६ ) सिल्लोडकडे येत होती. वांगी फाट्यावर भरधाव पिकअप व्हॅनने समोरून येणाऱ्या दुचाकीस जोरदार धडक दिली. यात दुचाकीवरून खाली पडलेल्या काकडे यांच्या डोक्यावरून पीकअप व्हॅनचे चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर व्हॅन चालक घटनास्थळावरून वाहनसोडून फरार झाला. प्रकाश रामराव काकडे यांच्या तक्रारीवरुन सिल्लोड ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास जमादार यतीन कुलकर्णी करीत आहेत.

## मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. गोविंद काळे यांचा दौरा कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. गोविंद काळे हे आयोगाच्या कामकाजासाठी मराठवाडा विभागाच्या दौऱ्यावर आहेत. त्या अनुषंगाने सोमवार दि.२९ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्तांसमवेत बैठक घेणार आहेत

## वेरुळ अजिंठा महोत्सव कालावधीत सोनेरी महाल परिसरात ध्वनिक्षेपक, ध्वनिवर्धक वापरास मध्यरात्रीपर्यंत परवानगी

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- वेरुळ अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव येत्या दि.२,३ व ४ फेब्रुवारी रोजी सोनेरी महाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे होत आहे. या कालावधीत सोनेरी महाल परिसरात सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक – ध्वनिवर्धक ध्वनिची विहित मर्यादा राखून परवानगी देण्यात येत असल्याचे आदेश प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे यांनी निर्गमित केले आहेत.

# जिल्हा क्रीडा पुरस्कार-जाहीर

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील गुणवंत क्रीडापटू, गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे / योगदानाचे मूल्यमापन करून त्यांचा गौरव व्हावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने त्यांचा जिल्हा क्रीडा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो. त्याअनुषंगाने सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२२-२३ या वर्षातील जिल्ह्यातील उत्कृष्ठ क्रीडापटू, (१ महिला, १ पुरुष, १ दिव्यांग खेळाडू) व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक असे एकुण १४ क्रीडा पुरस्कार दि.२६ जानेवारी २०२४ या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री संदीपान भुमरे छत्रपती यांच्या हस्ते पोलीस आयुक्तालय, मिलकॉर्नर, छत्रपती संभाजीनगर येथे प्रदान करण्यात येणार असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई यांनी कळविले आहे.

जिल्हा क्रीडा पुरस्कार

२०१९-२०

१.अभय कृष्णा शिंदे तलवारबाजी(आंतरराष्ट्रीय खेळाडू)

२. इंद्रजित महिंद्रकर बुध्दीबळ -थेट पुरस्कार (आंतरराष्ट्रीय खेळाडू)

३.ऋग्वेद जोशी जिम्नॅस्टिक्स

४. महिला -निधी धर्माधिकारी जिम्नॅस्टिक्स -थेट पुरस्कार (आंतरराष्ट्रीय खेळाडू)

५. सायली वझरकर जिम्नॅस्टिक्स-थेट पुरस्कार (आंतरराष्ट्रीय खेळाडू)

६. वैदेही लोहिया तलवारबाजी

७. क्रीडा मार्गदर्शक श्री दिपक रामकृष्ण रूईकर वेटलिफ्टींग

८. दिव्यांग खेळाडू देविदास एकनाथराव झिटे जलतरण-थेट पुरस्कार (आंतरराष्ट्रीय खेळाडू)

२०२१-२२

१. पुरूष मोहीत संजय सिंग तायक्वांदो

२. महिला स्वरुपा कोठावळे तायक्वांदो

३. क्रीडा मार्गदर्शक श्री प्रविण शिंदे जिम्नॅस्टिक्स

२०२२-२३ पुरूष गौरव गणपत म्हस्के बॉक्सिंग

२.महिला नयन गणेश निर्मल वुशू

३.क्रीडा मार्गदर्शक सुरेश पंढरीनाथ बहूले पॉवरलिफ्टिंग

## पद्म पुरस्काराने ३४ जणांचा गौरव

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पद्म पुरस्कार जाहीर केले असून एकूण ३४ जणांचा गौरव करण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचे मल्लखांब प्रशिक्षक उदय देशपांडेंना पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे.

मल्लखांब प्रशिक्षक उदय विश्वनाथ देशपांडे यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. उदय देशपांडे हे आंतरराष्ट्रीय मल्लखांब प्रशिक्षक आहेत. त्यांनी आतापर्यंत ५० देशातील ५ हजारहून अधिक लोकांना मल्लाखांबाचं प्रशिक्षण दिलं आहे. पद्मश्री विजेत्या चामी मुर्मू यांनी गेल्या २८ वर्षांत २८ हजार महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला आहे. चामी मुर्मू यांना या आधी नारी शक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांनी २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात त्यांना हा सन्मान दिला.

(पान १ वरुन)

## 'मविआ'च्या बैठकीत जागा वाटपावर...

जी भूमिका आमची आहे, तीच भूमिका प्रकाश आंबेडकर यांची आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा मित्रपक्ष म्हणून वंचित बहुजन आघाडी आहे आणि असेल. त्यामुळे येत्या काळात वंचित देखील जागावाटपात ३० जानेवारीला सहभागी होतील, योग्य तो पक्षांना न्याय मिळेल, असा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला.

४८ जागावर चर्चा झाली आहे. आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत. प्रत्येक घटकपक्ष आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. राजू शेट्टी यांच्याशी देखील व्यवस्थित चर्चा सुरू आहे. त्यामुळे त्यांचा देखील विषय लवकरच मार्गी लागेल. प्रत्येक जागा मविआची आहे. शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी या फॉर्म्युल्यावर आम्ही जाणार नाही. कारण ४८ जागांवर आम्हाला जिंकायचे आहे, असा निर्धार आम्हा महाविकास आघाडीचा आहे. दिल्लीच्या नेत्यांशी देखील आमची चर्चा झाली. सीपीआय, सीपीएम यांच्याशी देखील चर्चा झाली आहे. असेही संजय राऊत म्हणाले.

प्रकाश आंबेडकर यांचं समाधान झालंय . ३० तारखेला ते आमच्यासोबतच मिटिंगमध्ये येतील. त्यांचे प्रतिनिधी देखील असतील. आता त्यांचा जो गैरसमज होता तो दूर झाला आहे, असं कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

## नाना पटोलेंना निर्णय घेण्याचे...

राष्ट्रवादीचे जयंत पाटील आणि कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या सहीचा समावेश होता. मात्र मविआच्या या पत्रानंतर प्रकाश आंबेडकरांनी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना निर्णय घेण्याचे अधिकार नसल्याचं सांगितलं होतं. त्यानंतर ही बाब समोर आली.

लोकसभेच्या जागावाटपासंबंधी महाविकास आघाडीची आज एक बैठक झाली. त्यावेळी नाना पटोले यांना निर्णय घेण्याचा अधिकार नाहीत हे जयंत पाटलांनी स्पष्ट केलं. राष्ट्रवादीचे जयंत पाटील यांनी प्रकाश आंबेडकरांना फोन केला. प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या समस्या मांडल्या तेव्हा जयंत पाटील यांनी एआयसीसीचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चिन्नाथला यांनाही कॉलवर जोडले. रमेश चिन्नाथला आणि जयंत पाटील या दोघांनीही नाना पटोले यांना एमएव्ही आणि इंडीया मध्ये निर्णय घेण्याचा अधिकार नाही हे मान्य केले. महाराष्ट्रासाठी निर्णय घेण्याचे अधिकार बाळासाहेब थोरात आणि अशोक चव्हाण यांना देण्यात आले आहेत.

## शरद पवारांच्या परवानगीने...

प्रतिज्ञापत्रात शरद पवार काही जणांचं ऐकतात आणि मनमानी पद्धतीने कारभार करतात म्हणून आम्ही वेगळं निर्णय घेतला होता असं म्हणाले होते. दरम्यान सुनील तटकरे यांना शरद पवार गटाच्या वकिलांनी आपण या मताशी सहमत आहात का २०१९ मध्ये शरद पवार हे भाजप सोबत जायचं नाही या मताचे नव्हते त्यांच्या मताशी अनेकजण सहमत होते असा सवाल केला. त्यावर सुनील तटकरे यांनी म्हटलं की, त्यावेळी तशी परिस्थिती नव्हती. पुढे वकिलांनी अनेक प्रश्नांची पुरवणी दिली.

सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे आज विधिमंडळाच्या आमदार अपात्रता सुनावणीसाठी उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी विधिमंडळाच्या कोनशिलेजवळ शरद पवारांसोबत फोटो काढला. या कोनशिलेचे अनावरण शरद पवार मुख्यमंत्री असताना झालं होतं. आज शरद पवार तब्बल २९ वर्षानंतर विधिमंडळामध्ये राष्ट्रवादीच्या सुनावणीसाठी उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील चार पोलीस अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक, १८ पोलीस जवानांना शौर्य पदके

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- भारताच्या ७५व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस, अग्निशमन सेवा, गृहरक्षक दल आणि नागरी संरक्षण दल आणि सुधार सेवेतील एकूण ११३२ कर्मचाऱ्यांना शौर्य पदके जाहीर करण्यात आली आहेत. या यादीमध्ये महाराष्ट्रातील चार पोलीस अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक, १८ पोलिस अधिकाऱ्यांना शौर्य पदके आणि गुणवत्ता सेवेअंतर्गत ४० पदके पोलीस सेवेसाठी, सहा पदके अग्निशमन सेवेसाठी, सात पदके गृहरक्षक आणि नागरी संरक्षण, तर सुधारात्मक सेवेसाठी नऊ कारागृह अधिकाऱ्यांना पदके देऊन गौरविण्यात येणार आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाकडून प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पोलीस पदकांची यादी जाहीर झाली. यात महाराष्ट्रातील एकूण ७८ पोलिस अधिका-यांना तर सहा अग्निशमन विभागातील सहा अधिकाऱ्यांना उत्कृष्ट सेवेसाठी पदक जाहीर झाला आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाकडून जाहीर झालेल्या यादीत चार श्रेणींमध्ये पुरस्काराची घोषणा झाली आहे. यात, दोन सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना प्रतिष्ठित सेवेकरिता 'राष्ट्रपती शौर्य पदक' (पीएमजी), २७५ पोलीस अधिका-यांना 'पोलीस शौर्य पदक' (जीएम) तर विशिष्ट सेवेकरिता १०२ 'राष्ट्रपती पदक' (पीएसएम) तर गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ७५३ पदके जाहीर झाली असून, यामध्ये महाराष्ट्र राज्याला एकूण ८४ पदके जाहीर झाली आहेत. यामध्ये सहा अग्निशमन सेवेसाठी सहा पदकांचाही समावेश आहे.

यावर्षी जाहीर करण्यात आलेल्या पदकांच्या नुकत्याच झालेल्या पुनर्रचनेनंतर, प्रजासत्ताक दिन २०२४ निमित्त पोलीस, अग्निशमन सेवा, गृहरक्षक आणि नागरी संरक्षण आणि सुधारात्मक सेवा यांच्या एकूण ११३२ कर्मचाऱ्यांना शौर्य/सेवा पदके प्रदान करण्यात आली आहेत.

विविध पदकांचा सन्मान करण्यासाठीची संपूर्ण पदक व्यवस्था तर्कसंगत करण्यासह त्यात परिवर्तन करण्याच्या दृष्टीने गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने अनेक पावले उचलली असल्याने, या अनुषंगाने , सोळा शौर्य/सेवा पदके (पोलीस, अग्निशमन सेवा, गृहरक्षक दल आणि नागरी संरक्षण आणि सुधार सेवेसाठी) तर्कसंगत करण्यात आली असून चार पदकांमध्ये राष्ट्रपतींचे शौर्य पदक शौर्य पदक, विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक या श्रेणींमध्ये विलीन करण्यात आली आहेत.

## निवडणूक गीत मतदारांना प्रेरित करेल-मुख्य निवडणूक आयुक्त श्रीकांत देशपांडे

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- राज्यातील मतदारांना 'ये पुढे मतदान कर' असे आवाहन करणाऱ्या महाराष्ट्राच्या पहिल्या निवडणूक गीताचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आले. हे गीत राज्यातील मतदारांना आपला मताधिकार बजावण्यासाठी प्रेरित करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आज मुंबईतील जयहिंद महाविद्यालात झालेल्या कार्यक्रमात या गीताचे आणि त्याच्या ध्वनीचित्रफितीचे प्रकाशन झाले. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'स्वीप' उपक्रमाअंतर्गत या गीताची निर्मिती केली आहे. गीतकार स्वानंद किरकिरे अध्यक्षस्थानी होते. अभिनेते सुबोध भावे, संगीतकार मिलिंद इंगळे, गायक राहुल सक्सेना, गायिका वैशाली माडे, रॅपर जे. सुबोध आणि कस्तुरी आफळे उपस्थित होते.

२५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आगोयाची स्थापना झाली. यानिमित्त सन २०११ पासून हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. तरुण मतदारांना प्रोत्साहित करून त्यांचा सत्कार करून आणि मतदार नोंदणी वाढवून निवडणुकीत लोकांचा सहभाग वाढवणे हा या दिवसाचा उद्देश आहे. याचा उपयोग मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि निवडणूक प्रक्रियेत माहितीपूर्ण सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी देखील केला जातो. हा दिवस राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, मतदारसंघ आणि मतदान केंद्रस्तरावर साजरा केला जातो, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य हे देशातील लोकशाही व्यवस्थेमुळेच आहे. ते टिकावे यासाठी मतदारांनी आपला मताधिकार बजावून या स्वातंत्र्याचे रक्षण करायला हवे, असे आवाहन श्री. किरकिरे यांनी केले. देशात होणाऱ्या आगामी सर्व निवडणुकांमध्ये मताधिकाराचा योग्य वापर करू या, ज्यांनी अजूनही मतदार म्हणून नोंदणी केलेली नाही, त्यांनाही नोंदणी करायला लाऊ या, असे अभिनेते श्री. भावे यांनी सांगितले. ते म्हणाले की, देशाचे सामान्य नागरिक हेच देशाचे खरे मालक आहेत. त्यांनी मतदानाच्या दिवशी आपला मताधिकार बजावायला हवा. या गीताच्या लोकार्पणासोबतच राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त नव मतदारांना मतदार ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच मतदारांना शपथही देण्यात आली. यावेळी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी मतदारांना दिलेल्या संदेशाची ध्वनीचित्रफितही दाखविण्यात आली.

